# तहसीलदार उदगीर यांचे कार्यालय

**(निवडणूक विभाग)**

संदर्भ :- 1. मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दिनांक 23.09.2025
2. मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश जि.प.प.स.निवडणूक कार्यक्रम दिनांक 13.01.2026
3. मा. जिल्हाधिकारी लातूर यांचे आदेश दिनांक 23.09.2025

**जा.क्र.2026/निवडणूक जि.प.पं.स./ कावि- 3** **दिनांक.21.01.2026**

**// आदेश //**

ज्याअर्थी लातूर जिल्हा परिषद व उदगीर पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम संदर्भ क्र. 2 नुसार घोषीत करण्यात आलेला आहे. सदर निवडणूकीसाठी दिनांक 01.07.2026 रोजीची भारत निवडणूक आयोगाकडील विधानसभा मतदार यादीचे संबंधीत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या अंतिम प्रभाग रचनेनुसार मतदार यादीचे विभाजन करण्याबाबत सुचना देण्यात आली आहे. त्या नुसार निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय प्रारुप मतदार यादी दिनांक 08.10.2025 रोजी प्रसिध्द करुन त्यावर दिनांक 08.10.2025 ते दिनांक 14.10.2025 दरम्यान नागरिकांच्या हरकती व सुचना दाखल करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि या कालावधीत सदर मतदार यादीवर एकही आक्षेप - हरकत दाखल झालेली नाही त्यानंतर दिनांक 27.10.2025 रोजी निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय मतदार यादया अंतिम, अधिप्रमाणीत करुन, मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भ क्र. 1 वरील आदेशान्वये दिनांक 23.09.2025 रोजीच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी मतदार यादी तयार करण्याबाबत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. तथापी मा. राज्य निवडणूक आयोगाकडून मतदान केंद्र निहाय यादया प्राप्त झाल्या नंतर मतदान केंद्रनिहाय यादया चे अवलोकन केले असता त्यामध्ये निडेबन निवडणूक विभागातील निडेबन निर्वाचक गणामध्ये यादी भाग क्र. 309, 310, 311,312,313,314 या मधील मतदार, मतदान केंद्रक्रमांक 23, 24, 25,26,27,28 या मतदान केंद्रासाठी जोडलेले असुन याच मतदारांचा समावेश दिनांक 02.12.2025 रोजी पार पडलेल्या उदगीर नगर परिषद निवडणूकीसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादी मध्येही करण्यात आल्याचे निदर्शनास आले. उपरोक्त यादी भागातील मतदारांचा उदगीर नगर परिषद निवडणूकीत मतदार यादीत समावेश झालेला असल्याने पुन्हा जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणूकीमध्ये त्यांचा मतदार यादीत समावेश करणे कायदेशीर होणार नाही. सदर बाब नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या कालावधीत निदर्शनास आली

त्यामुळे प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार उदगीर यांस मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे आदेश क्र. 2025 / जि.प.पं.स/कावि-932 दिनांक 23.09.2025 नुसार निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय मतदार यादया अंतिम करुन अधिप्रमाणित करणे तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक 23.09.2025 च्या


दुरध्वनी क्र.02385255567 Email ID : tahsildarudgir@gmail.com

आदेशानुसार कामकाज करणे बाबत प्राधिकृत केल्यानुसार मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक 23.09.2025 रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. 8 नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात दुरुस्ती या शिर्षकाखालील सुचनेनुसार उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार नगर परिषद उदगीर सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी वापरलेल्या मतदान केंद्र क्रमांक 23, 24, 25,26,27, 28 मौ. निडेबन येथील मतदान केंद्रावर यादी भाग क्र. 309, 310, 311,312,313,314 या भागातील मतदार जोडल्याचे निदर्शनास आल्याने सदर मतदारांचा समावेश जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 साठीच्या केंद्रनिहाय मतदार यादीत करणे उचित होणार नाही. सबब उपरोकत संदर्भ क्र. 3 नुसार प्राप्त अधिकारानुसार मी राम बोरगावकर तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी, जि.प.पं.स. सार्वत्रिक निवडणूक 2026 साठी मतदार यादीत दुरुस्ती करत असुन मतदान केंद्र क्रमांक 23, 24, 25,26,27,28 व यादी भाग क्र. 309, 310, 311,312,313,314 मौ. निडेबन या मतदान केंद्रातील सर्व मतदार नगर परिषदे च्या यादीत स्थलांतरीत (Shifted) झाल्याने व त्या लगतच्या नगर परिषद निवडणूकीत मतदानाचा हक्क बजावल्याने पुनश्च जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीसाठीच्या मतदार यादीत त्यांचा झालेला समावेश रद्द करुन मतदान केंद्र क्रमांक 23, 24, 25,26,27,व 28 यादी भाग क्र. 309, 310, 311,312,313,314 या मतदान केंद्रावरील मतदार संख्या निरंक करण्यात येत आहे. याशिवाय मतदार यादीत इतर कोणताही बदल करण्यात येत नाही.

29.05.2025

(राम बोरगावकर)
तहसिलदार, उदगीर तथा,
प्राधिकृत अधिकारी जि.प./पं.स.निवडणूक 2026.

# तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार उदगीर यांचे कार्यालय

**(निवडणूक शाखा)**

जा.क्र.2026/जि.प.प.स निवडणूक/कावि-5 दि. 27/01/2026

**शुध्दीपत्रक**

मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक 13/01/2026 रोजीच्य आदेशानुसार लातूर जिल्हा परिषद व उदगीर पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 साठी कार्यक्रम घोषित झालेला असून त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्राची छाननी, उमेदवारांना निवडणूक चिन्ह वितरण करणे हे टप्पे पूर्ण झालेले आहेत. सदर निवडणूकीसाठी उदगीर तालुक्यात एकूण 7 निवडणूक विभाग व 14 निर्वाचक गणात निवडणूक पार पडत आहे. या कामी मतदान कैंद्रनिहाय मतदार यादया मा. राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने तयार करण्यात आलेल्या आहेत.

यादरम्यान निवडणूक विभाग निडेबन व निर्वाचक गण निडेबन अंतर्गत यादी भाग क्र. 309, 310,311, 312, 313, 314 मधील मतदार ज्यांचेसाठी मतदान कैंद्र क्रमांक 23, 24, 25, 26, 27, 28 निश्चीत करण्यात आलेले होते. तथापि उदगीर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक 2026 साठी उपरोक्त मतदार यादी भागातील मतदारांचा समावेश नगर परिषद निवडणूकीसाठी करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने सदर यादी भागातील व वर नमुद मतदान कैंद्रासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती करिता मतदान घेता येणार नाही. करीता निडेबन निर्वाचक गण व निडेबन निवडणूक विभागा साठीच्या मतदान कैंद्र क्र 23, 24, 25, 26, 27, 28 विधानसभा यादी भाग क्र 309, 310,311, 312, 313, 314 या भागातील मतदार यापूर्वीच नगर परिषद उदगीर निवडणूक यादीमध्ये स्थलांतरीत झाल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी सदर मतदार यादी रद्द करण्यात येत आहे. या मतदान कैंद्रावर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी मतदान होणार नसल्याचे संबंधितांना कळविण्यात येते.

(राम बोरगावकर)
तहसीलदार उदगीर तथा
प्राधिकृत अधिकारी जि.प.पं.स. निवडणूक 2026

प्रति,

मा. तहसीलदार उदगीर, तथा

मा. राज्य निवडणूक आयोगाने केलेले प्राधिकृत अधिकारी

विषय:- मतदार यादी बाबत संयुक्त रित्या अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ:- मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी उदगीर भाग क्र. 309,310,311,312,313,314

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय सादर करण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक 02.12.2025 रोजी व दिनांक 20.12.2025 रोजी या दोन तारखेमध्ये नगर परिषद उदगीर सार्वत्रिक निवडणूक चे मतदान घेण्यात आले आहे. सदरील निवडणूकीकरीता उदगीर तालुक्यातील शहरी भागासाठी भाग क्र. 309,310,311,312,313,314 चे एकूण मतदार हे सर्व शहरी भागाच्या प्रभागासाठी निवडणूकीमध्ये मतदार यादीत समाविष्ठ होते. या बाबत नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 उदगीर ची मतदार यादी पडताळणी करुन पाहण्यात आले. या बाबत आम्ही सर्व मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी उदगीर हे या बाबत अहवाल सादर करुन सदरील मतदार हे शहरी भागाकरीता नगर परिषद उदगीर सार्वत्रिक निवडणूक 2025 करीता मतदान करण्यासाठी यादीत समाविष्ठ करण्यात आलेले आहेत.

सदरील भागातील मतदार दिनांक 01.07.2025 रोजी च्या दिनांक अहर्तावरील मतदार हे नगर परिषद उदगीर च्या सार्वत्रिक निवडणूकीच्या एकूण मतदार यादीतमध्ये समाविष्ठ असुन एकही मतदार वगळण्यात आलेले नाहीत करीता सबब अहवाल एकत्रीत रित्या खात्री करुन संयुक्त अहवाल सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू ,

1. मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी, भाग क्र. 309 , पारखे विनोद प्रभु [signature]
2. मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी, भाग क्र. 310 , कदम बालाजी गणेश –
3. मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी, भाग क्र. 311 , दाउगे एस. डी. [signature]
4. मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी, भाग क्र. 312 , चमगर आर. आर [signature]
5. मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी, भाग क्र. 313 , बिरादार पि. एम. [signature]
6. मतदान कैंद्रस्तरीय अधिकारी, भाग क्र. 314 , मांडवकर एन. जी. [signature]

कार्या - 2 28/PS निवडणूक

[signature] 29.09.2५

इतिवृत्त दि. २९/०१/२०२६

आज दिनांक २९/०१/२०२६ रोजी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उदगीर जि.प./प.स. सार्वत्रिक निवडणूक तथा तहसिलदार उदगीर यांच्या अध्यक्षतेखाली निडेबन निवडणूक विभाग व निडेबन निर्वाचक गणातील निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची व निवडणूक लढवणाऱ्या पक्षांच्या तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांची बैठक तहसिल कार्यालय उदगीर येथे आयोजित करण्यात आली.

यामध्ये तहसिलदार उदगीर यांनी सर्व संबंधित निवडणूक लढवणारे उमेदवार व राजकिय पक्षाचे पदाधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले की, निडेबन जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणातील यादी भाग क्र. 309 310 311, 312, 313, 314 या भागासाठीचे मतदान केंद्र क्रमांक 23, 24, 25, 26 (लालबहादुर शास्त्री शाळा) तसेच मतदान केंद्र क्रमांक 27, 28 वसंतराव नाईक शाळा या ठिकाणी असलेले मतदार उदगीर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2026 साठीच्या मतदार यादीमध्ये प्रविष्ट झालेले होते. त्यामुळे त्यांचा जि.प./प.स. सार्वत्रिक निवडणूक 2026 साठीच्या मतदार यादीत समावेश होणे अपेक्षित व कायदेशीर नाही. त्यामुळे या यादी भागातील सर्व मतदार उदगीर न.प. निवडणूकीत (shift) स्थलांतरित असल्याने या सर्व मतदान केंद्रांवर जि.प./प.स. निवडणूकीसाठी या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार नसल्याचे सर्वांसमक्ष सांगितले.

निडेबन जि.प. गट व गणासाठी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीवर कोणताही आक्षेप आलेला नसला तरी याबाबी निदर्शनास आल्याने मा. जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत अधिकारी म्हणून लातूर यांचे दिनांक 23.09.2025 रोजीच्या आदेशान्वये तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक 23.09.2025 च्या आदेशातील मुद्दा क्रमांक 08 नुसार सदर दुरुस्ती करण्यात येत असल्याचे सर्व उपस्थितांना सांगितले, सदर बाब त्यांना ही मान्य असल्याचे सर्वांनी सांगितले. यावेळी खालील प्रमाणे सर्व संबंधित उमेदवार, पक्षप्रतिनिधी हजर आहेत. त्या सर्वांचे शंकानिरसन करून दि. 05/02/2026 रोजी होणाऱ्या मतदानादिवशी सहकार्य करण्याबाबत आवाहन करून उपस्थित सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

(पुढे चालू)

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | निर्वाचन गण/गट | निवडणूकीतील पक्ष | पद/उमेदवार पक्ष प्रतिनिधी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | दिपक्ष संग्राम सोमवंशी | नीडेबन गट | NCP | उमेदवार | [signature] 29/1/26 |
| 02 | रणजीत पाटील | निडेबन गट | कॉंग्रेस | उमेदवार | [signature] |
| 03 | संदिप अशोक कोयले | निडेबन गण | कॉंग्रेस | प्रतिनीधी | [signature] |
| 04 | श्रीकांत बापुराव सोनिवे | निडेबन गण | शिवसेना | प्रतिनिधी | [signature] |
| 05 | सूर्यभान वामनराव चिखले | निडेबन गण | राष्ट्रवादी | " | [signature] |
| 06 | जाधव नरसिंग माधव | निडेबन गट | शिवसेना | उमेदवार | [signature] |
| 07 | जितेंद्र आत्माराम कांबळे | निडेबन (उदगीर) | वंचीत बहुजन आघाडी | उमेदवार | [signature] |
| 08 | शशीकांत धोंडिबा सामवरी | (निडेबन) | NCP | प निवडनुक प्रतिनीधी | [signature] |
| 09 | चिखले विमल शिवाजी | निडेबन | NCP | उमेदवार | [signature] |
| 10 | चिखले सुनिता मनोज | निडेबन | NCP | प्रतिनिधी | [signature] |
| 11 | श्री कल्याण बापूसाहेब पाटील | | कॉंग्रेस [signature] | प्रदेश सचिव कॉंग्रेस | [signature] |

[stamp] अ.ने. निम्मावाई

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | निलेश गणेश मांडवकर | निडेबन BLO 314 | [signature] |
| 12 | विनोद प्रभू पारखे - लाल बहादुर शास्त्री देगलूर रोड उदगीर | BLO 309 | [signature] 29/01/2026 |
| 13 | बिरादार प्रभाकर मारोती - वसंतराव नाईक प्रा. विद्यालय बाबूउदगीर | BLO-313 | [signature] |
| 14 | दाडगे शिवाजी दिगंबरराव - ला. ब. शास्त्री मा. वि. उदगीर | B.L.O. 311 | [signature] |
| 15 | अमगर रामदास रावसाहेब - ला. ब. शास्त्री. मा. वि. उदगीर | BLO-312 | [signature] |

[signature]
तहसीलदार उदगीर तथा
प्राधिकृत अधिकारी
जि. प. / पं. स. सार्वत्रिक निवडणूक - 2026.